28-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/27/2025 10:33 PM Page 1



## निवडक

### हरमलात आज मिरची संघटनेची बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २७ :** येथील जीआय मानांकन नोंदणीकृत मिरची संघटनेची बैठक शुक्रवार, दि. २८ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता हरमल पंचायत सभागृहात होणार असल्याचे मिरची संघटनेचे सचिव दत्ताराम पार्सेकर यांनी कळविले आहे. या बैठकीत संस्थेच्या स्थापनेपासूनचा जमा खर्च सादर करणे, नवीन कार्यकारिणीची निवड, नाबार्डच्या सहकार्याने योजनाबाबत चर्चा व अध्यक्षाच्या परवानगीने उपस्थित विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. या बैठकीस जीआय मानांकनचे अधिकारी दीपक परब उपस्थित राहणार आहेत. संघटनेच्या सदस्यांनी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घ्यावा व संघटनेचे कार्य पुढे न्यावे, असे आवाहन सचिव पार्सेकर यांनी केले आहे.

### केरी-सत्तरीत ३० रोजी 'संगीत सुवर्ण तुला'

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २७ :** सार्वजनिक गुढीपाडवा उत्सव समिती केरी-सत्तरीतर्फे गुढी संस्कृतीची कार्यक्रमात रविवार, दि.३० मार्च रोजी संध्या.७.३० वा.सरकारी माध्यमिक विद्यालय केरी-सत्तरीच्या क्रीडा मैदानावर श्री भूमिका देवी संगीत विद्यालय पर्ये सत्तरीचे विद्याधर गोखले लिखित व शिवनाथ नाईक दिग्दर्शित 'संगीत सुवर्ण तुला' हे नाटक सादर करण्यात येणार आहे. या नाटकात सुनिल दिवकर (नारद), विठ्ठल गावस(श्रीकृष्ण), शिवनाथ नाईक (बलराम), अरविंद गावडे (महामंत्री), विष्णू गावडे (प्रतिहार),.स्नेहल गोपाळ गावस(सत्यभामा), मनिषा महेश परब (रूक्मिणी),प्रसन्ना हरिश्चंद्र राऊत (राधा) यांनी भूमिका साकारणार आहेत. महेश गावस ऑर्गनवर व शैलेश शिरोडकर तबल्यावर संगीतसाथ करणार आहेत. दीपक गावस यांचे पार्श्वसंगीत शुभम निळकंठ खलप यांची रंगभूषा, उदय घाडी यांची वेशभूषा, उमेश कारबोटकर यांची प्रकाशयोजना तर गुरुप्रसाद रंगमंच कासरपाल यांचे नेपथ्य लाभले आहे.

### हरमलात ३० रोजी अखेरची अंगाई नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २७ : येथील श्री रवळनाथ प्रासादिक नाट्य मंडळातर्फे गुढीपाडव्यानिमित रविवार, दि. ३० मार्च रोजी संध्या ७.३० वाजता संगीत अखेरची अंगाई नाटक देऊळवाडा हरमल श्री देव रवळनाथ मंदिर प्रांगणात होणार आहे. या नाटकाचे दिग्दर्शन कमलाकर परब यांनी केले आहे. नाटकात शिवा तोरसकर, अभिषेक नाईक, तुकाराम नाईक, यशवंत नाईक, रेशम नाईक, साईश नाईक, सिद्धेश नाईक व उत्कर्षा नाईक यांच्या भूमिका आहे. या नाटकास उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

### नारायणदेव मंदिरात ३० रोजी कीर्तन

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २७ :** खालचावाडा येथील श्री नारायण देव देवस्थान मंदिरात गुढीपाडव्यानिमित रविवार, दि. ३० मार्च रोजी संध्या ७.३० वा कीर्तन कार्यक्रम होणार आहे. तत्पूर्वी, सकाळी धार्मिक विधी, गुढी पूजन,तीर्थप्रसाद होईल. या कार्यक्रमात ह भ पी विष्णुबुवा शेटगावकर यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. त्यांना प्रभाकर गावकर (हार्मोनियम) व अजित शेटगावकर (तबला) यांची साथसंगत आहे. भाविक व श्रोत्यांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर व मुख्यत्यार संतोष तांडेल यांनी केले आहे.

### सावईवेरेत उद्या व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २७ :** छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त ' छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या गोमंतकातील पाऊलखुणा ' या विषयावर व्याख्यान होणार आहे. सदर व्याख्यानाचा कार्यक्रम सावईवेरे येथील नववर्ष स्वागत समितीतर्फे आयोजित करण्यात आला असून हा कार्यक्रम शनिवार दि. २९ मार्च रोजी संध्याकाळी ४.३० वा. ग्रामपंचायत वाचनालयाच्या सभागृहात होणार आहे. नामवंत शिल्पकार व इतिहास संशोधक सचिन मदगे हे या विषयावर भाष्य करणार आहेत.तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहावे .

# संगणक विज्ञानात करिअरच्या विपूल संधी

## प्रा. स्नेहल हरमलकर यांचे प्रतिपादन | साखळी महाविद्यालयात कार्यशाळा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २७ :** सध्याचा काळ हा तंत्रज्ञानाचा काळ आहे. हे युग संगणक युग असल्याकारणाने संगणक विज्ञानात करिअरच्या नवनवीन संधी निर्माण होत आहेत, असे प्रतिपादन धेंपे कला अणि विज्ञान महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापिका स्नेहल हरमलकर यांनी केले. त्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथे आयोजित करण्यात आलेल्या लॉजिक टू लॉंच : बिल्डिंग अ करिअर इन कम्प्युटर सायन्स या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत बोलत होत्या.

ही कार्यशाळा संगणक विज्ञान विभागाने डीबीटी स्टार कॉलेज योजनेंतर्गत आयोजित केलली होती. स्नेहल हरमलकर यांनी लॉजिक बिल्डिंग, डीबगिंग आणि संगणक विज्ञानात बीएसस्सी पूर्ण केल्यानंतर करिअरच्या असणाऱ्या संधी विद्यार्थ्यांना विशद केल्या. या कार्यशाळेचे समन्वयन संगणक विज्ञानातील सहायक प्राध्यापक पूजा नाईक यांनी केले. संगणक विज्ञानातील विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी कळाव्यात, त्याचे आकलन व्हावे, हा दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठवेून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.



**साखळी : लॉजिक टू लॉंच : बिल्डिंग अ करिअर इन कम्प्युटर सायन्स या विषयावरील कार्यशाळेत मुख्य मार्गदर्शक सहाय्यक प्राध्यापिका स्नेहल हरमलकर. यांच्या सोबत विद्यार्थी वर्ग व प्राध्यापक**

**४६ विद्यार्थ्यांचा सहभाग**

लॉजिक टू लॉंच : बिल्डिंग अ करिअर इन कम्प्युटर सायन्स या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत महाविद्यालयातील ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी मुख्य मार्गदर्शक प्रा. स्नेहल हरमलकर यांना प्रश्न विचारून आपल्या शंकाचे निरसन करून घेतले.




# विजय निचानीने जिंकली मा. नॅशनल स्नूकर चॅम्पियनशिप

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांबोळी,दि. २७ :** मास्टर्स नॅशनल स्नूकर अजिंक्यपद २०२५ चा समारोप क्यू स्पोर्ट्स अकादमी, ॲथलेटिक स्टेडियम, कुजिरा, बांबोळी येथे रोमांचक पद्धतीने झाला. तामिळनाडूच्या विजय निचानीने अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यात पीएसपीबीच्या मनन चंद्राचा ४-३ असा पराभव करत विजेतेपदाला गवसणी घातली.

बिलियर्ड्स स्नूकर असोसिएशन ऑफ गोवा (बीएसएजी) ने बिलियर्ड्स अँड स्नूकर फेडरेशन ऑफ इंडियाच्या सहकार्याने या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत देशभरातील अव्वल खेळाडूंनी त्यांच्या अपवादात्मक कौशल्यांचे आणि खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन केले. बक्षीस वितरण समारंभाला बीएसएजीचे अध्यक्ष साईश हेगडे, खजिनदार केवल एस. काणे आणि सचिव जगदीश बडीगेर उपस्थित होते. समारोप समारंभ प्रमुख पाहुणे आदेश कारवारकर यांच्या हस्ते पार पडला, ज्यांनी विजेता विजय निचानी यांना ट्रॉफी प्रदान केली. या अजिंक्यपद स्पर्धेने केवळ स्पर्धात्मक उत्कृष्टतेवर प्रकाश टाकला नाही तर गोव्यात क्यू स्पोर्ट्सची वाढती लोकप्रियता देखील साजरी केली. या कार्यक्रमाला भव्य यश मिळवून दिल्याबद्दल आयोजकांनी सहभागी, अधिकारी आणि प्रायोजकांचे आभार मानले.

# केकेआरचा राजस्थानवर शानदार विजय

**गुवाहाटी, दि. २७ :**

क्विंटन डीकॉकच्या (९७*) शानदार अर्धशतकी खेळीच्या जोरावर इंडियन प्रिमिअर लीगमध्ये खेळविल्या गेलेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने राजस्थान रॉयल्सवर ८ गडी राखून सहज मात केली. प्रथम गोलदांजी करणाऱ्या कोलकाताला १५२ धावांचे आव्हान राजस्थानकडून मिळाले होते.

तुलनेने सोपे असलेले हे आव्हान कोलकाताने २ गडी गमावून १७.३ षटकात पार पाडले. डिकॉकने एकट्याने ६१ चेंडूचा सामना करत ९७ धावा कुटल्या. यामध्ये ८ चौकार व ६ षटकारांचा समावेश होता.

गुवाहाटीच्या खेळपट्टीवर फलंदाजी सोपी नव्हती आणि हे जाणून घेत पॉवरप्लेमध्ये कोलकाताने संथ सुरुवात केली. पॉवरप्लेमध्ये केकेआरला फक्त ४० धावा करता आल्या, संघाने ७.४ षटकांत ५० धावांचा टप्पा गाठला. मोईन अली आणि अजिंक्य रहाणे सहज फलंदाजी करू शकले नाहीत.





पण क्विंटन डि-कॉकने प्रभावी खेळी केली. डि-कॉकने ३६ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. यानंतर डि-कॉकने अंगक्रिश रघुवंशीसह ३० चेंडूत ५० धावांची भागीदारी करत केकेआरचा विजय निश्चित केला.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना राजस्थानचे फलंदाज कोलकातासमोर सपशेल अपयशी ठरले. वरुने चक्रवर्तीच्या फिरकीसमोर राजस्थानचे फलंदाज ढेपाळले त्याने २ बळी घेत केवळ १७ धावा दिल्या. मोईन अली, हर्षित राणा, वैभव राणा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. स्पेन्सर जॉन्सनने एक बळी घेतला. कोलकाताच्या घातक गोलंदाजीमुळे राजस्थानच्या फलंदाजांना १५१ धावांवर रोखण्यात आले. नाणेफेक जिंकल्यानंतर कोलकाताने राजस्थानला फलंदाजीला पाचारण केले. राजस्थानचे फलंदाज मोठी धावसंख्या उभारण्यास अपयशी ठरली. राजस्थानच्या ध्रुव जुरेल याने सर्वाधिक ३३ धावा केल्या. रियान पराग २५ तर यशस्वी जैस्वाल २९ धावा काढून बाद झाले. जोर्फा आर्चर १६ तर संजू सॅमसनही अपयशी ठरल्याचे दिसले त्याने केवळ १३ धावा केल्या. बाकीचे फलंदाज केवळ एकअंकी धावसंख्या करु शकले. तर राजस्थानच्या संघाचा या हंगामातील हा सलग दुसरा पराभव आहे. त्यांना आपला पहिला सामना हैदराबादविरुद्ध खेळला होता. यात त्याने ४४ धावांनी पराभव सहन करावा लागला होता. पहिल्या तीन सामन्यांमध्ये संजू सॅमसनच्या जागी राजस्थान संघाचे नेतृत्व रियान पराग करत आहे.

# पर्यावरणाच्या रक्षणासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा

**प्राचार्य नामदेव गावस : विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उत्साहात**

■ टीम दैनिक हेराल्ड



**साखळी, दि. २७ :** निसर्गाचे संवर्धन म्हणजे मानवी जीवनाचे संवर्धन होय. म्हणूनच पर्यावरणाच्या रक्षणासाठी विद्यार्थ्यांनी सक्रिय पावले उचलावीत, पर्यावरणाच्या रक्षणासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी केले. कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील निसर्ग क्लब समितीच्या वतीने आयोजित केलेल्या वनस्पती प्राणी संवादावर रील मेकिंग स्पर्धा आणि पक्ष्यांची घरटी बनविणे स्पर्धांच्या बक्षीस वितरणावेळी प्राचार्य नामदेव गावस बोलत होते.

यावेळी आयक्यूएसीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर, निसर्ग क्लब समितीच्या सदस्य वर्षा साईल, संयोजक डॉ. आरती पानशेकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आयक्यूएसीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर यांनी आपल्या मनोगतात सहभागी विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नांचे आणि विद्यार्थ्यांनी मांडलेल्या नाविन्यपूर्ण कल्पनांने कौतूक केले. तर वर्षा साईल यांनी विद्यार्थ्यांनी अशा अर्थपूर्ण कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन आपले व्यक्तिमत्त्व सर्वांगीण बनवावे असे उद्गार काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमा सावंत यांनी केले. दीपक कुभांर यांनी छायाचित्रणाच्या माध्यमातून कार्यक्रमाचे संस्मरणीय क्षण टिपले. निसर्ग क्लबच्या संयोजक डॉ.आरती पानशेकर यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक प्रयत्न केले.

वनस्पती-प्राणी संवादावर आधारित रील मेकिंग स्पर्धेत भावार्थ धोंड, योहान मकानदार, इरान बोकरे आदी विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला. तर पक्ष्याची घरटी बनविण्याच्या स्पर्धेत आलिया खान, समीक्षा काणेकर आणि योगीता गावकर आदी विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव विकसित करणे आणि निसर्ग संवर्धनात विद्यार्थ्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडावी, निसर्गाबाबतच्या जबाबदाराचे भान विद्यार्थ्यांना यावे, तसचे निसर्ग आणि विद्यार्थी यामधील नाते अधिक दृढ व्हावे, यासाठी वनस्पती प्राणी संवादावर रील मेकिंग स्पर्धा आणि पक्ष्यांची घरटी बनविणे स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते, अशी माहिती आपल्या मनोगतात स्पर्धा संयोजक डॉ. आरती पानशेकर यांनी दिली.

# करुण नायरचे भारतीय संघात कमबॅक ?

**मुंबई, दि. २७ :** इंग्लंड दौऱ्याची तयारी करण्यासाठी भारतीय क्रिकेट संघ मे-जूनमध्ये दोन चार दिवसांचे सामने खेळणार आहे. या काळात, काही वरिष्ठ संघातील खेळाडू भारत 'अ' संघाचा भाग असू शकतात, जेणेकरून त्यांना पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेपूर्वी सामना सराव करता येईल. भारत २० जून रोजी हेडिंग्ले येथे पहिला कसोटी सामना खेळणार आहे. २००७ नंतर पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये मालिका जिंकण्याचे भारताचे ध्येय असेल. इंग्लंडमध्ये, 'अ' संघाचे सामने ३० मे रोजी कॅन्टरबरीच्या स्पिटफायर ग्राउंडवर आणि ६ जून रोजी नॉर्थम्प्टनच्या काउंटी ग्राउंडवर खेळले जातील. या सामन्यांमध्ये करुण नायरला संधी मिळू शकते.



भारतीय निवड समितीकडे 'अ' संघाची घोषणा करण्यासाठी अजूनही बराच वेळ आहे आणि करुण नायर या दौऱ्याचा भाग असू शकतो. या खेळाडू करुण नायरने २०२४-२५ च्या देशांतर्गत हंगामात चमकदार कामगिरी केली आहे.

करुण सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता. रणजी ट्रॉफीमध्ये नायरने ९ सामन्यांमध्ये ५४ च्या सरासरीने ८६३ धावा केल्या. ४ शतके आणि २ अर्धशतके त्याच्या बॅटमधून आली. त्याच्या कामगिरीमुळे विदर्भाने केरळला हरवून तिसरे रणजी विजेतेपद जिंकले. आता करुण नायरला त्याचे बक्षीस मिळू शकते. तसे, करुण नायरने इंग्लंडमधील काउंटी क्रिकेटमध्येही खूप धावा केल्या आहेत. गेल्या वर्षी त्याने नॉर्थम्प्टनशायरसाठी द्विशतकही केले होते. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दोन कसोटी मालिका गमावल्यानंतरही इंग्लंड दौऱ्यावर रोहित शर्माकडे कर्णधारपदाची धुरा सोपवण्याची अपेक्षा आहे.

# टॉम लॅथम वनडे मालिकेतून बाहेर

**वेलिंग्टन, दि. २७ :** न्यूझीलंडचा यष्टीरक्षक-फलंदाज टॉम लॅथम दुखापतीमुळे पाकिस्तानविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. सराव करताना त्याचा उजवा हात फ्रॅक्चर झाला. त्याच्या जागी फलंदाज हेन्री निकोल्सचा संघात समावेश करण्यात आला आहे. लॅथमच्या अनुपस्थितीत मायकेल ब्रेसवेल संघाचे नेतृत्व करेल. दोन्ही संघ २९ मार्चपासून ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत आमनेसामने येतील. मालिकेतील शेवटचा सामना ५ एप्रिल रोजी खेळला जाईल. या आठवड्यात नेटमध्ये फलंदाजी करताना लॅथमला दुखापत झाली. एक्स-रे नंतर त्याच्या हातात फ्रॅक्चर झाल्याचे उघड झाले. न्यूझीलंड क्रिकेटने सांगितले की त्याला किमान चार आठवडे मैदानापासून दूर राहावे लागेल.

हेन्री निकोल्सने आतापर्यंत ७८ एकदिवसीय सामने खेळले आहेत. तो पायाच्या दुखापतीतून बरा झाल्यानंतर स्थानिक क्रिकेटमध्ये परतला आहे, त्याने सहा डावांमध्ये पाच अर्धशतके झळकावली आहेत. या सामन्यात तो लॅथमच्या जागी फलंदाजी करेल.

दरम्यान, सलामीवीर विल यंग त्याची गर्भवती पत्नी जेनिफर बर्मिंगहॅमसोबत असल्याने दुसऱ्या आणि तिसऱ्या एकदिवसीय सामन्याला मुकणार आहे. यंग शनिवारी नेपियरमध्ये मालिकेतील पहिला सामना खेळेल. त्याच्या जागी कॅन्टरबरीचा नवा फलंदाज रिस मार्यू खेळेल, ज्याला पहिल्यांदाच संघात स्थान देण्यात आले आहे.

# गुरु हा ज्ञानाचा सागर : कालिदास गावस

## भूमिका उच्च माध्यमिकचे स्नेहसंमेलन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २७ :** गुरु हा ज्ञानाचा सागर आहे. त्यामुळे आपण सर्वांनी गुरूंचा आदर राखायलाच पाहिजे, असे कालिदास गावस यांनी सांगितले.

पर्ये सत्तरी येथील श्री भूमिका शिक्षण संस्थेच्या श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाच्या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. विद्यालयाच्या सभागृहात झालेल्या

संमेलनाच्या उद्घाटनाला व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून कालिदास गावस, संस्थेचे व्यवस्थापक शिवाजीराव राणे सरदेसाई, संस्थेचे सचिव कुष्ठा राणे, प्राचार्य यशवंत सावंत, शंकर च्यारी, काशिनाथ म्हाळशेकर, लक्ष्मण च्यारी, उपप्राचार्य रावसाहेब राणे, गुरुप्रसाद मांद्रेकर, विद्यार्थी प्रमुख शुभम सामंत, विद्यार्थिनी प्रमुख एंजल लोपेस, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्रार्थनेने झाली. तसेच विद्यार्थिनी भूमी पार्सेकर व प्रिया वागर या विद्यार्थिनींनी गणेशवंदना सादर केली. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य यशवंत सावंत यांनी स्वागत व प्रास्ताविक व वार्षिक अहवाल सादर केला. मान्यवरांचे यावेळी फुलांनी स्वागत करण्यात आले.

उद्घाटनपर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका श्रद्धा सामंत देसाई यांनी केले तर शुभम सामंत याने आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सांस्कृतिक कार्यक्रमात अकरावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांना आश्विनी गावकर, दिव्या गावकर, सुनिता गावकर, श्रद्धा सावंत देसाई, कल्पिता आमाडकर, शिल्पा गावकर, योगेश गावकर, अंकिता गावस, अमर गावस, पूजा महाले, स्नेहा नाईक, हेमंती परब, पूजा पाटील, रक्षमा साळकर, नितीन नाईक, प्रिया म्हापसेकर यांचे मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन शिक्षक नितीन नाईक, हेमंती परब,व रक्षमा साळकर या शिक्षकांनी संपूर्ण कार्यक्रम रंगतदार केला.



**पर्ये : स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करताना कालिदास गावस. सोबत शिवाजीराव राणे सरदेसाई, कुष्ठा राणे, प्राचार्य यशवंत सावंत, शंकर च्यारी, काशिनाथ म्हाळशेकर, लक्ष्मण च्यारी, उपप्राचार्य रावसाहेब राणे व गुरुप्रसाद मांद्रेकर.**

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 204 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .